**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com**

**परभणी, कृषी हवामान सल्ला** **मंगळवार, दिनांक: ०१ जून २०२१**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक ०२ ते ०६ जून २०२१ ) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | ०२/०६ | ०३/०६ | ०४/०६ | ०५/०६ | ०६/०६ |
| पाऊस | १९.० | ४.० | १३.० | ७.० | १.० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३९.० | ३७.० | ३७.० | ३८.० | ३८.० |
| किमान तापमान (अं.से.) | २६.० | २६.० | २५.० | २५.० | २६.० |
| ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | अंशत: ढगाळ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६५ | ६२ | ६४ | ६२ | ६१ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५१ | ५१ | ५१ | २१ | ५० |
| वा-याचा वेग (किमी / तास) | १० | १० | ९ | १३ | १५ |
| वा-याची दिशा | नैऋत्य | वायव्य | पश्चिम-वायव्य | पश्चिम-नैऋत्य | पश्चिम-वायव्य |

| हवामानाचा इशारा | हवामान अंदाजानुसार जिल्हयात पुढील पाच दिवसात तुरळक ठिकाणी वादळी वारा, विजांचा कडकडाट, वाऱ्याचा वेग अधिक राहून (ताशी 30-40 किलोमिटर) पावसाची शक्यता आहे. | |
|---|---|---|
| **पिकांचे नाव** | **अवस्था** | **कृषि हवामान सल्ला** |
| कापूस | वाणांची निवड | कापूस पिकाच्या लागवडीसाठी वाण निवडताना जमिन व हवामान, कोरडवाहू किंवा बागायती, लागवडीचा प्रकार व वाणांचे गुणधर्म यांचा विचार करावा. |
| तुर | वाणांची निवड | तुर पिकाच्या पेरणीसाठी बीडीएन-2, बीडीएन-708 (अमोल), बीडीएन-711, बीएसएमआर-853, बीएसएमआर-736, बीडीएन-716 किंवा गोदावरी या वाणांपैकी एका वाणाची निवड करावी. |
| मुग/उडीद | वाणांची निवड | मुग पेरणीसाठी बीएम-4, कोपरगाव, बीपीएमआर-145, बीएम-2002-1, बीएम-2003-2, या वाणांची तर उडीद लागवडीसाठी बीडीयु-1, टीएयू-1, या वाणांची निवड करावी. |
| भुईमूग | वाणांची निवड | भुईमूग पिकाच्या लागवडीसाठी एसबी-11, एलजीएन-2 (मांजरा), टीएजी-24, टीजी-26, टीएलजी-45, एलजीएन-1, एलजीएन-123 या वाणांपैकी एका वाणाची निवड करावी. |
| मका | वाणांची निवड | मका पिकाच्या पेरणीसाठी नवज्योत, मांजरा, डीएमएच-107, केएच-9451, एमएचएच, प्रभात, करवीर, जेके-2492, महाराजा, यूवराज इत्यादी वाणांपैकी एका वाणाची निवड करावी. |
| केळी | लागवड/वाढीची | पूरेसा पाऊस झाल्याशिवाय नवीन केळी फळबागेची लागवड करू नये. पूर्वी लागवड केलेल्या बागेत आंतर मशागतीची कामे पूर्ण करून घ्यावी. केळीच्या घडांना काठीचा आधार द्यावा. बागेतील वाळलेली पाने काढून टाकावीत. |
| आंबा | लागवड/वाढीची | पूरेसा पाऊस झाल्याशिवाय नवीन आंबा फळबागेची लागवड करू नये. पूर्वी लागवड केलेल्या बागेत आंतर मशागतीची कामे पूर्ण करून घ्यावी जेणेकरून बागेत वाळवीचा प्रादुर्भाव होणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| द्राक्ष | वाढीची अवस्था | द्राक्ष बागेत पानांची विरळणी करावी. |
| सिताफळ | लागवड/वाढीची अवस्था | पूरेसा पाऊस झाल्याशिवाय नवीन सिताफळ फळबागेची लागवड करू नये. पूर्वी लागवड केलेल्या बागेत आंतर मशागतीची कामे पूर्ण करून घ्यावी. |
| भाजीपाला | पूर्वमशागत/काढणी | खरीप हंगामात भाजीपाला लागवडीसाठी रोपे तयार करण्यासाठी रोपवाटीकेत जागा तयार करून घ्यावी. तुरळक ठिकाणी वादळी वारा, विजांचा कडकडाट, वाऱ्याचा वेग अधिक राहून (ताशी 30-40 किलोमिटर) पावसाची शक्यता असल्यामुळे, काढणीस तयार आसलेल्या भाजीपाला पिकांची तसेच टरबूज, खरबूज इत्यादी पिकांची काढणी करावी. |
| फुलशेती | पूर्वमशागत/काढणी | खरीप हंगामात फुलपिकाच्या लागवडीसाठी रोपे तयार करण्यासाठी रोपवाटीकेत जागा तयार करून घ्यावी. तुरळक ठिकाणी वादळी वारा, विजांचा कडकडाट, वाऱ्याचा वेग अधिक राहून (ताशी 30-40 किलोमिटर) पावसाची शक्यता असल्यामुळे, काढणीस तयार असलेल्या फुलपिकांची काढणी करून घ्यावी. |
| पशुधन व्यवस्थापन | ------- | तुरळक ठिकाणी वादळी वारा, विजांचा कडकडाट, वाऱ्याचा वेग अधिक राहून (ताशी 30-40 किलोमिटर) पावसाची शक्यता असल्यामुळे, जनावरांना उघडयावर सोडू किंवा बांधू नये. निवा-याच्या ठिकाणी बांधावे व पावसात भिजणार नाहीत याची काळजी घ्यावी. तसेच पाऊस चालू होण्याच्या वेळी झाडाच्या आडोशाला थांबु नये. आज जागतिक दुग्ध दिवस आहे. दुधास पूर्ण अन्न संबोधल्या जाते म्हणून दुध प्या व तंदुरुस्त रहा. दुधातील लॅक्टोफेरीन हा घटक शरीरातील अनेक जैविक क्रियांमध्ये मदत करतो मानवास तंदुरूस्त राहण्यास योगदान देतो. उत्तम दुध तंदुरूस्त पशुधनापासूनच प्राप्त होते व पशुधनाचे आरोग्य तंदुरुस्त ठेवण्यासाठी त्यांना सकस आहार वेळेत लसीकरण व जंतनाशक द्या. पशुधनास निरोगी ठेवा. |
| सामुदायिक विज्ञान | ----- | घरातील खोल्या लहान असतील तर भिंतीना फिका रंग द्यावा त्यामूळे खोली मोठी असल्याचा आभास निर्माण होईल. गडद रंगामुळे खोली अधिक लहान वाटते. |

सदर कृषी सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.